


PRATHAM BOOKS
A Book in Every Child's Hand


वाचन पातळी ३

# भभलू अस्वलाचा फेरफटका

Author: Paro Anand

Illustrator: Suvidha Mistry

Translator: Meera Deshpande



दूर हमिालयाच्या बर्फाच्छादति पर्वतावर एक सुंदर लहानसे अस्वल राहत होते.
भभलू अस्वलाच्या लांब चमकणार्‍या काळ्या दाट केसांत एकही पांढरा केस

नव्हता. चंचल व मस्तीखोर अस्वल जंगलात सर्वांचे आवडते आणि विशेषत: आईचे लाडके होते.



पण ते अतशिय दंगेखोर होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत भभलू सगळ्या जंगलात धुमाकूळ घाले आणि बिचाऱ्या आईला मात्र सारखं ओरडावं लागे.

“भभलू बेटा मस्ती करू नकोस.”
“भभलू थोडा वेळ बस, आराम कर.”
“अरे भभलू लागेल, जरा सांभाळून.”
“भभलू रात्र झाली आहे बाळा, आता तरी झोप,”
आई सांगत राहायची आणि मिस्तीखोर अस्वल
नवीन-नवीन खोड्या करत राहायचे.



ही अशाच एका रात्रीची गोष्ट आहे. आई खूप थकली होती. तलिा दोष देण्यात काय अर्थ म्हणा? दविसभर भभलूच्या खोड्या नसि्तरता नसि्तरता पार दमून गेली होती. परंतु भभलूच्या चंचल मनात बरेच प्रश्न रुंजी घालत होते.

“रात्री सूर्य कुठे झोपतो?”
“चंद्राची आई कोण आहे?”
“ज्यावेळी रात्री मला झोप येत नाही, त्यावेळी आईला झोप का येते?”

“का? कुठे? केव्हा? कसे?”

“कसे? केव्हा? कुठे? का?”



भभलूचे डोके अशा अनेक प्रश्नांनी चक्रावून गेले. तो गुपचूप गुहेबाहेर येऊन बसला. रात्रीचा अंधार चित्रविचित्र आवाजांनी भरलेला होता. रातकिड्यांची किरकिर, थंड हवेतील पानांची सळसळ. पौर्णिमेचा चंद्र आणि तारे यांच्या उजेडामुळे जंगल चमकत होते. परंतु भभलूला अजूनही चैन पडत नव्हते. अनेक प्रश्न फुलपाखरांप्रमाणे त्याच्या मनात रुंजी घालत होते.



भभलूचे स्वप्न होते की तो काहीतरी असे करून दाखवेल की ज्यामुळे संपूर्ण जग आश्चर्यचकति होईल. कोणती तरी अशी गोष्ट ज्यामुळे लहान-मोठे सर्वजण म्हणतील, “वा! भभलूने हमिालयातील अस्वलांना जगभरात प्रसदि्ध केले!”

पण कसे? अशी कोणती गोष्ट होती की ज्यामुळे छोटेसे अस्वल जगभर प्रसदि्ध होईल?



वचिारात दंग असलेल्या भभलूची नजर एका उंच देवदार वृक्षावर गेली. हवेमुळे झाड हलत होते. जेव्हा झाड एका बाजूला हलत होते, तेव्हा असे वाटत होते की जणू काही त्याच्या उंच फांद्या चंद्राला स्पर्श करून जात आहेत.

अचानक भभलूला एक युक्ती सुचली! त्याचे डोळे चमकले,
आनंदाने त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहलिे. आणि त्याला खूप नाचावेसे वाटले!!!

परंतु त्याला माहीत होते की जर त्याच्या आवाजाने
आई  उठली तर ती त्याला पुन्हा झोपायला लावेल.
आणि जिर का तलिा भभलूच्या मनातली गोष्ट कळली
तर ती त्याच्यावर खूप रागवेल व त्याचे स्वप्न अपुरे राहील...



अरे हो, तुम्ही वचिार करत असाल की अखेर भभलूच्या मनात झाड बघून असा कोणता वचिार आला की ज्यामुळे त्याचे प्रसदि्धी मळिवण्याचे स्वप्न खरे होऊ शकेल?

मी तुम्हाला सांगते.....

तो झाडावर चढण्यात पटाईत होता. तो त्या उंच देवदार झाडावर चढून जाईल. जेव्हा झाड वार्‍यामुळे चंद्राकडे झुकेल तेव्हा भभलू पटकन उडी मारून चंद्रावर पोहचेल!





चंद्रावर पोहचलेलं पहिलं अस्वल हा मान आपल्याला मिळणार याची त्याला खात्री होती.
सगळे आश्चर्याने थक्क होतील.

जगातली सगळी अस्वलं तर हेवा वाटून अगदी जळतील. विशेषत: सोना, मोना. जे नेहमी त्याच्या स्वप्नांची टर उडवत होते. जाड भिंगांचे चश्मे लावलेले शास्त्रज्ञ (ज्यांच्याबद्दल त्याच्या आईने भभलूला सांगितले होते) लांब दुर्बिणीने त्याला चंद्रावर नाचताना बघतील.



पत्रकार त्याच्याबद्दल वर्तमानपत्रांत लिहितील, त्याचे फोटो छापतील आणि त्याला प्रश्न विचारतील. भभलू चंद्रावरूनच त्यांची उत्तरे देईल...
आणि कदाचित त्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरेही त्याला मिळतील.



हुऽऽऽ जर यावेळेस तुमच्यासारखे समजूतदार कुणी तथि असते तर! तुम्ही भभलूला सांगू शकला असतात की झाड कितीही उंच झाले, तरी चंद्राला थोडेच स्पर्श करणार?

फक्त दुरून असे वाटते की झाडाच्या लांब फांद्या आकाशापर्यंत पोहचल्या आहेत. पण खेदाची गोष्ट अशी की तिथे हे भभलूला समजवणारे कोणीही नव्हते!



शेवटी आपल्या आनंदावर काहीसे नयिंत्रण ठेवत भभलू जंगलाकडे गेला.

हवा खूप थंड होती, पण भभलू आपल्या वचिारात इतका दंग होता की त्याला थंडी जाणवली नाही आणि आपल्या मोठमोठ्या अस्वली केसांमुळे त्याला दवाच्या थेंबांच्या ओलेपणाचीही जाणीव झाली नाही.



त्याला फक्त लवकरात लवकर देवदारच्या झाडाजवळ पोहचायचे होते
आणि आपले स्वप्न पूर्ण करायचे होते. भभलू वेगाने पळू लागला.
जोराने आणखी जोराने, आपल्या झाडापर्यंत जाईपर्यंत तो जोराने पळत होता.
झाडाखाली पोहचल्यावर भभलूने वर पाहिले.



हो, हो, त्याचा अंदाज एकदम बरोबर होता,
झाड खरोखरंच आकाशापर्यंत पोहचले होते.
आता इकडेतकिडे न बघता, भभलू भरभर
झाडावर चढू लागला, वर, वर आणखी वर.
झाड खूप उंच होते.

वर चढता चढता थंडी वाढू लागली.

आणि भभलूने पाहिले, हळूहळू झाडाच्या
फांद्या आणखी बारीक वाटू लागल्या.





तो स्वत:शीच पुटपुटला, “फक्त फांद्या बारीक होत आहेत की मी जाड होत आहे?”

परंतु भभलू अस्वलाला त्याची पर्वा नव्हती. बस, तो फक्त चढत होता, वर आणखी वर.

शेवटी तो वरपर्यंत पोहचला. खूप आनंद झाल्यामुळे (थंडी आणि खूप उंचीमुळे सुद्धा) भभलूला चक्कर येऊ लागली. त्याने विचार केला, ‘वा! आता ती वेळ आली आहे की ज्यामुळे सगळे बदलून जाईल. मला फक्त एक लांब उडी मारावी लागेल व माझी सर्व स्वप्ने पूर्ण होतील.’

परंतु... तुम्हाला माहीत आहे काय झाले असेल... हो की नाही?



जशी त्याने शेवटची उडी मारण्यासाठी आपली मान वर केली तेव्हा त्याने पाहिले, अरे! हे काय? चंद्र तर अजून खूप दूऽऽऽऽरऽऽऽऽ आहे. हो तेवढाच जेवढा तो नेहमी असतो.

जेव्हा भभलूला आपला मूर्खपणा लक्षात आला तेव्हा त्याला त्याच्या आईच्या बोलण्यातील खरेपणा कळला, “भभलू तू आधी करतोस आणि नंतर त्याचा विचार करतोस.” गुपचूप झाडावरून उतरून गुहेत परत जाण्यातच शहाणपणा आहे.

पण?... जसा तो झाडावरून उतरण्यास माघारी वळला, तसा एक विचित्र आवाज आला.



कड! कड! कड!

कडाक!

कडाककड!

कडाककड!

कडाक!



हा कोणता वचित्रि आवाज होता? झाडाच्या बारीक, नाजूक फांद्या भभलूच्या वजनाने खाली तुटू लागल्या होत्या.

आ... आ...

आई ऽ ऽ ऽ

आ ऽ आ ऽ आ ऽ आ ऽ ऽ ऽ

आई ऽ ऽ ऽ धप !

सगळीकडे शांतता होती. कुठे हुं नाही की चुं नाही. आई गाढ झोपेतून एकदम खडबडून उठली.

“भभलू?” तिने हाक मारली. पण तो गुहेमध्ये कुठेच दिसत नव्हता. “भभलू?”
“भभलू...?! भभलू...?!
भभलू, बाळा, तू कुठे आहेस?
भ...भ...लू !!
अरे बापरे!”

तिचा आवाज कापरा झाला होता. आई धापा टाकीत व थरथरत जंगलात पळत सुटली. भितीने तिच्या डोळ्यांत अश्रू तरळले.
“भभलू!?!!??”
परंतु बिचारा भभलू जंगलात थंड, ओल्या जमिनीवर पडला होता. काही हालचाल न करता, डोळे बंद करून, एकदम स्तब्ध होता.
शांत.

“भभलू!! ??!! अरे बापरे!”





आईने छोट्या भभलूला अगदी जवळ जाऊन बघितले. त्याच्या छातीवर खोल जखम झाली होती. भभलूच्या रक्ताने जंगलातील जमिनीला लाल रंग येत होता. आणि भभलू पडला होता, निश्चल. “भभलू बाळा, तुला हे काय झालं माझ्या लेकरा?” आईच्या डोळ्यातून टपटप अश्रू वाहू लागले.

आता काय होईल? काय भभलूची गोष्ट येथेच संपून जाईल? इथेच, या दु:खी वळणावर?


चला, पुढे काय होते ते पाहू...

आई भभलूजवळ हुंदके देत बसली होती. अचानक तिच्या हाताला गुदगुदली झाल्यासारखे झाले. काय हे? तिच्या हातात एक बारीक चमकणारी वस्तू नाचत होती.



ती वस्तू एका लांब धाग्यासारखी होती. जेव्हा आईने वर पाहिले तेव्हा तिला आश्चर्य वाटले. तो लांब चमकणारा धागा म्हणजे चंद्राचा किरण होता! तिला असे वाटले जणू काही चंद्र हसून तिला काहीतरी सांगत आहे... “हो-हो, लवकर कर!”

चंद्राला काय सांगायचे आहे हे आईला समजले. तिने पटकन देवदारचे एक सुईसारखे टोकदार पान घेतले व त्यात करिणाला ओवून भभलूची जखम शिवू लागली. भभलूच्या काळ्याभोर केसांवर करिण आणखी चमकत होता.



जखम पूर्ण शविून होताच भभलूने डोळे उघडले... “आई! आई, मला क्षमा कर...
ते झाड... तो चंद्र... मला वाटले... पण... मला क्षमा कर आई!”


परंतु आईचे डोळे आपल्या लाडक्या मुलाला पुन्हा बोलताना बघून आनंदाने भरून आले. तिने भभलूला जवळ घेऊन शांत केले. “काही झाले नाही भभलू, आता तू एकदम ठीक आहेस. माझ्या बाळा...”



आतापर्यंत जंगलातील सर्व अस्वले काय चालले आहे हे पाहण्यासाठी तथि गोळा झाली होती. भभलूच्या छातीवरील ‘V’ आकाराचे चन्हि बघून सर्वजण आश्चर्यचकति झाले. त्यांना माहीत नव्हते की हा नाजूक चमकणारा गोल खरं तर चंद्राचा करिण आहे.

“वा भभलू!” सर्व अस्वलांनी माना हलवत म्हटले.

“अरे भभलू! तू तर आता जंगलातील सगळ्यात सुंदर अस्वल आहेस,”
काही अस्वल मुलींनी लाजत म्हटले.



आणि सोना-मोना? दोघेही बिचारे अगदी गप्प उभे होते. आता ते बोलणार तरी काय? भभलूचे स्वप्न अखेरीस खरे झाले होते.

जेव्हा इतर अस्वलांना खरी हकीकत कळली तेव्हा सर्व लहान मोठ्या अस्वलांनी हट्ट धरला की त्यांना पण तसेच चमकणारे ‘V’ चिन्ह हवे आहे. आईने हसत चंद्राकडे पाहिले.



आणखी एक किरण पकडला. देवदारच्या टोकदार पानात किरण ओवून दुसऱ्या अस्वलांच्या छातीवर एक-एक करून ‘V’ आकाराचे चिन्ह शिवू लागली. भभलूला खूप गंमत वाटत होती. तो खाली बसून आपल्या छातीवरील चमकणारी खूण सारखी बघत होता. चंद्राचा किरण किती सुंदर होता!

एकदम त्याला आठवले की अजूनपर्यंत कोणीही चंद्राचे आभार मानले नव्हते. पण जेव्हा भभलूने आकाशाकडे पाहिले तेव्हा तो ओरडला, “अग आई थांब! सर्वजण थांबा! चंद्राला बघा!”



आणि खरोखरच चंद्र आता पाहिल्यासारखा मोठा चमकणारा गोळा नव्हता. तो आता काहीसा अशक्त दिसत होता. सर्व अस्वलांना वाईट वाटले. “अरेरे! आपण चंद्राची इतकी करिणे घेतली की तो बिचारा लहान झाला.”

पण चंद्र हसून म्हणाला, “प्रिय अस्वलांनो चिंता करू नका. काही दिवसात मी पुन्हा मोठा गोल होईन. माझी जादू बघा!”



आणि हो खरोखरंच काही दविसातच चंद्र पुन्हा पहलि्यासारखा गोलमटोल दसिायला लागला आणि पुन्हा भभलूच्या आईने आणखी काही अस्वलांच्या छातीवर ‘V’ आकाराचे चन्हि शवायिला सुरुवात केली.

तुम्हालाही रात्री आकाशात पाहलि्यावर जाणवेल. जेव्हा चंद्र बारीक आणि अशक्त होतो तेव्हा हमिालयाच्या बर्फाळ शखिरावर भभलूची आई आपल्या नव्या कामात दंग असते.

पुन्हा जेव्हा चंद्र हळूहळू पहिल्यासारखा गोल मोठा होत जातो तेव्हा भभलूची आई चंद्राला विश्रांती देत असते.



काय म्हणता? भभलूचं काय झालं? अरे हो, छोटासा भभलू, तो खरोखर प्रसद्धि झाला. कारण तो नसता तर हमिालयातील इतर अस्वलांना ‘V’ या चन्हािचा पत्ता कसा लागला असता? ती सर्व नुसती काळीच राहलिी असती. आहे की नाही!?!

PRATHAM BOOKS
storyweaver

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Story Attribution:

This story: भभलू अस्वलाचा फेरफटका is translated by Meera Deshpande . The © for this translation lies with Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Based on Original story: ' Bhabhloo Bear’s Adventure ' , by Paro Anand . © Pratham Books , 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Other Credits:

This book has been published on StoryWeaver by Pratham Books. The print book of 'Bhabhloo Aswalaachaa Pherphatkaa' has been published by Pratham Books in partnership with Rajiv Gandhi Foundation. www.prathambooks.org

Illustration Attributions:

Cover page: A black bear atop a deodar tree looking at the forest landscape with fascination , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 2: A black bear cub sitting excitedly on a rock in a snowy background , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: A snowy land with deodar trees , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 4: Moon shining from behind the deodar trees , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 5: A black bear sitting on a rock with questions in his head , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 6: A beautiful snowy moonlit land with deodar trees , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 7: Two snow-laden deodar trees in the corner , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 8: A small bear looking up at the moon in the middle of a deodar forest , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 9: Two men with a telescope and a binocular on a snowy land; two bears looking sideways with suspicion , by Suvidha Mistry ©

Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 10: A bear sitting on the surface of a planet, a man reading a newspaper article about a bear , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Illustration Attributions:

Page 11: A black Himalayan bear cub strolling happily on a snowy land , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 12: Deodar trees lined up on a snow-laden land , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 13: A small bear climbing a deodar tree in a snow-laden land , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 14: A black bear climbing a deodar tree happily , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 15: A black bear atop a deodar tree looking at the moon with fascination , by Suvidha Mistry ©

Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 16: A background of snow, trees and mountains , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 17: A tree broken in half and a bear falling from it , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 18: A bear lying on the ground, wounded and crying in pain , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 20: A moon amidst clouds winking in the sky , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 21: A black bear worried about an injured bear lying on the ground bloody and wounded , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 22: Two bears hugging each other , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 23: A group of black bear friends , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link .

Illustration Attributions:

Page 24: A moon amidst clouds sending rays to earth , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 25: Bears line up to get moon beam sewed on their chests , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 26: Mountains in a snowy background , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 27: Moon shining through the clouds , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 28: A black bear smiling up at the moon , by Suvidha Mistry © Pratham Books, 2010. Some rights reserved. Released under CC BY 4.0

license. Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC--BY--4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

भभलू अस्वलाचा फेरफटका (Marathi)

भभलू अस्वलाचे आयुष्य रोमांचक आहे. तो ते अतिशय उत्साहाने घालवतो! त्याच्या रात्रीच्या साहसाची गोष्ट वाचा आणि तुम्हाला हिमालयांतील अस्वलांचे गुपित कळेल.

या पुस्तकाची वाचन पातळी ३ आहे. आपले आपण वाचू शकणाऱ्या मुलांसाठी.

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India -- and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!